0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :-
१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक ०८/०३/२०१३ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१६/२०१३/जा.१९१, दिनांक १३/०३/२०१३ व २१/०३/२०१३.
३) उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांचा दिनांक १८/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवाल.
४) मे. फुड बाजार यांचे दिनांक १९/०३/२०१३ रोजीचे लेखी निवेदन.
५) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गोवंडी पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक २०/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.
६) मे. फुड बाजार यांचे दिनांक ०२/०४/२०१३ रोजीचे निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१६/२०१३/जा.४५३
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : २० /०५ /२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

### आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक १४/०२/२०१३ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह सकाळी सुमारे १०.०० वाजता मे. फुड बाजार, के स्टार्स., डायमंड गार्डन जवळ, चेंबूर, मुंबई येथे अन्नधान्य व खाद्यतेल साठा तपासणीसाठी भेट दिली. सदर ठिकाणी उपस्थित असलेले स्टोर्सचे सुपरवायझर जनार्दन काळूराम काळे यांचे समवेत उपरोक्त पथकातील अधिकाऱ्यांनी अन्नधान्य व खाद्यतेल साठा तपासणी केली असता, भेटीच्या वेळी सदर दुकानात खाद्यतेलाचा ११०.५० क्विंटल इतका साठा आढळून आला. सदर बाबत पंचासमक्ष संबंधित अधिकाऱ्यांनी अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ तसेच महाराष्ट्र किरकोळ वस्तू विनीयमन आदेश, १९९८ अन्वये आवश्यक असलेला परवाना घेतला आहे काय ? अशी विचारणा केली असता अशाप्रकारचा कोणताही परवाना अद्याप घेतला नसल्याचे जनार्दन काळूराम काळे यांनी स्पष्ट केले. मात्र याबाबत

उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांचे कार्यालयात दोन वर्षापूर्वी अर्ज सादर केला असल्याचे सांगितले. मात्र सदर अर्जाची स्थळप्रत तपासणीवेळी सादर केली नाही. तसेच उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांचे कार्यालयाने दिनांक २४/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीसाठी पाठविलेल्या नोटीसीस प्रतिसाद दिला नसल्याचे सदर तपासणी दरम्यान आढळून आले.

सदर दुकानातील खाद्यतेल साठ्यापैकी विनापरवाना अनुज्ञेय साठा १५ क्विंटल वगळून उर्वरीत ९५.५० क्विंटल साठा अंदाजे रुपये ७,५०,०००/- हा विनापरवाना असल्याचे आढळल्याने सदर साठा संबंधित स्टोर्सचे सुपरवायझर यांना त्यातील खाद्यतेलाची किरकोळ विक्री थांबविण्याची सुचना देवुन जागीच जप्त करण्यात आला आहे. याबाबत पंचासमक्ष अधिकाऱ्यांनी सुपुर्दनामा तयार करुन सदर साठा स्टोर्सचे सुपरवायझर जनार्दन काळूराम काळे यांचेकडे सुपुर्दनाम्याद्वारे सुपुर्द केला आहे. तसेच अधिकाऱ्यांनी स्टोअर्सचे सुपरवायझर यांना पुढील आदेशापर्यंत काहीही विक्री करता येणार नाही तसेच सदर साठा जतन करण्याबाबत स्पष्ट सुचना दिलेल्या आहेत. सदर सुचना स्टोर्सचे सुपरवायझर जनार्दन काळूराम काळे यांनी पंचासमक्ष मान्य केलेल्या आहेत.

अशाप्रकारे, मे. फुड बाजार, के स्टार्स., डायमंड गार्डन जवळ, चेंबूर, मुंबई या किरकोळ विक्रीच्या दुकानात सदर दुकानाचे मालक व सुपरवायझर यांनी खाद्यतेलाचा कोणताही परवाना धारण केलेला नसताना विनापरवाना मोठया प्रमाणावर खाद्यतेलाची साठवणूक करुन अवैध विक्री करीत असल्याचे आढळून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याने, जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३ व ७ तसेच महाराष्ट्र अनुसूचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९७९ चे कलम ३ चा भंग केल्याने त्यांचेविरुद्ध गोवंडी पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.र.क्र. ०५/२०१३, दिनांक १४/०२/२०१३ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक १९/०३/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १९/०३/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. फुड बाजारचे असिस्टंट मॅनेजर (लिगल) श्री. संदीप खेडेकर व मॅनेजर श्री. सुनित साळगावकर हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ४ अन्वये लेखी निवेदन सादर करुन त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणीकरीता १० दिवसांची मुदत मागितली आहे. सदर सुनावणीस

तपासी पोलिस अधिकारी हे उपस्थित राहिले नाहीत. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक ०२/०४/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०२/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. फुड बाजारचे असिस्टंट मॅनेजर (लिगल) श्री. संदीप खेडेकर व मॅनेजर श्री. सुनित साळगावकर हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ६ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी उपस्थित राहीले नाहीत.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

## युक्तिवाद :-

अनुज्ञप्ती प्राधिकारी तथा उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांचे दिनांक १९/०३/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवालात, मे. फुड बाजार, के स्टार मॉल, डायमंड गार्डन जवळ, चेंबूर, मुंबई-२८ यांनी किरकोळ परवाना मिळणेसाठी दिनांक १८/०१/२०१० रोजी ई परिमंडळ कार्यालयास अर्ज व आवश्यक कागदपत्रे सादर केली. सदरचा अर्ज व कागदपत्र पडताळणी व चौकशी करीता शिधावाटप कार्यालय क्र. ३३-ई-चेंबूर या कार्यालयात पाठविण्यांत आली होती. संबंधित शिधावाटप निरीक्षक यांनी चौकशी करुन सदर कागदपत्रांची पुर्तता करण्याबाबत संबंधितांना सुचना दिल्या होत्या. परंतु अर्जदाराने शिधावाटप कार्यालय क्र. ३३-ई-चेंबूर येथे कोणत्याही प्रकारचा संपर्क साधला नाही किंवा लेखी स्वरुपात कळविले नाही. त्यामुळे शिधावाटप कार्यालय क्र. ३३-ई-चेंबूर यांनी मुळ नस्ती ई परिमंडळ कार्यालयास परत पाठविली. त्यानंतर ई परिमंडळ कार्यालयाने दिनांक १७/०४/२०१० रोजी अर्जदारास पत्र देवुन कागदपत्रांची पुर्तता तात्काळ करावी असे सुचित करण्यात आले. तरीसुद्धा अर्जदाराने ई परिमंडळ कार्यालयास संपर्क साधलेला नाही. तद्नंतर दिनांक २७/१२/२०१२ रोजी अंतिम सुचनापत्र देवुन परवान्यासाठी लागणारे आवश्यक मुळ कागदपत्र व त्यांच्या छायांकित प्रतीसह दिनांक ०३/०१/२०१३ रोजी सुनावणी उपस्थित राहण्यास कळविण्यात आले होते. परंतु, सदर दिवशी ते अनुपस्थित होते. त्यानंतर पुन्हा दिनांक २१/०१/२०१३ रोजी अंतिम नोटीस बजावुन दिनांक २४/०१/२०१३ रोजी मुळ कागदपत्रे घेवुन सुनावणीस उपस्थित राहण्यास सुचित करण्यात आले होते. सदर दिवशी ते अनुपस्थित होते. सद्यस्थितीत संबंधितांनी आवश्यक नविन कागदपत्रांची अद्यापपर्यंत पुर्तता केलेली नसल्यामुळे त्यांना किरकोळ परवाना वितरीत करण्यात आलेला नाही, असे नमूद आहे.

दिनांक ०२/०४/२०१३ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. फुड बाजारचे असिस्टंट मॅनेजर (लिगल) श्री. संदीप खेडेकर व मॅनेजर श्री. सुनित साळगावकर यांनी कंपनीच्या सादर केलेल्या लेखी निवेदनात, त्यांनी स्टोअरच्या पत्त्यावर शिधावाटप विभागाचा परवाना मिळण्यासाठी अर्ज केला असून अधिकाऱ्यांनी त्यांच्या नमूद स्टोअरवर भेट

दिली असता, खाद्यतेलाचा साठा हा विहीत मर्यादेपेक्षा अतिरिक्त आढळून आला आहे. त्यांच्या कंपनीच्या किरकोळ व्यवसायात देशभरात अनेक स्टोअर कार्यरत असून त्यांचा ग्राहकांना वाजवी किंमतीत पुरवठा करण्याचे ध्येय आहे. त्यांचे स्टोअर हे मोठे असल्याने बरेचशे ग्राहक हे एकाचवेळी स्टोअरमध्ये भेट देत आहेत. स्टोअरच्या वतीने बिग डेज ही स्किम नियमितपणे राबविण्यात येत असून सदर दिवशी एकाच वेळेस ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती असते. त्याचदिवशी म्हणजेच वेनसडे बाजाराच्या दिवशी आपल्या अधिकाऱ्यांनी स्टोअरवर भेट दिली व सदर दिवशीच ग्राहकांच्या मागणीनुसार साठ्याची अतिरिक्त साठवणूक केली जाते. त्याअनुषंगाने ग्राहकांची गरज लक्षात घेऊन त्यांनी सदर दिवसासाठी मोठ्या प्रमाणावर खाद्यतेलाची खरेदी केली आहे. सदरचा खरेदी केलेला खाद्यतेलाचा साठा हा त्यांच्या अपेक्षेनुसार फार कमी आहे. परंतु आश्चर्यकारकरित्या ग्राहकांकडून सदर साठयाची खरेदी फार कमी प्रमाणात झाल्याने शिल्लक असलेला साठा तो वितरकास परत करणे अथवा इतर ठिकाणी हलविणे शक्य झाले नाही. त्यामुळे सदरचा साठा हा जागीच साठवणूक करण्याशिवाय इतर पर्याय उपलब्ध नव्हता. सदर प्रकरणी त्यांचा साठेबाजीचा कोणताही उद्देश नसून केवळ ग्राहकांच्या गरजा भागविण्यासाठी साठवणूक केले आहे. त्यामुळे याप्रकरणी उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेऊन योग्य तो निर्णय घेण्यात यावा, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

---

**<u>निष्कर्ष :-</u>**

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक १४/०२/२०१३ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांच्या अधिपत्त्याखालील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह मे. फुड बाजार, के स्टार्स., डायमंड गार्डन जवळ, चेंबूर, मुंबई येथे अन्नधान्य व खाद्यतेल साठा तपासणीसाठी भेट दिली. सदर भेटीच्या वेळी सदर दुकानात खाद्यतेलाचा ११०.५० क्विंटल इतका साठा आढळून आला. सदर बाबत अधिकाऱ्यांनी अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ तसेच महाराष्ट्र किरकोळ वस्तू विनीयमन आदेश, १९९८ अन्वये आवश्यक असलेला परवाना घेतला आहे काय ? अशी विचारणा केली असता अशाप्रकारचा कोणताही परवाना अद्याप घेतला नसल्याचे निदर्शनास आले. मात्र याबाबत उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांचे कार्यालयात दोन वर्षापूर्वी अर्ज सादर केला असल्याचे सांगितले मात्र सदर अर्जाची स्थळप्रत तपासणीवेळी सादर केली नाही. तसेच उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांचे कार्यालयाने दिनांक २४/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीसाठी पाठविलेल्या नोटीसीस प्रतिसाद दिला नसल्याचे सदर तपासणी दरम्यान आढळून आले. तपासणी दरम्यान सदर दुकानातील खाद्यतेल साठ्यापैकी विनापरवाना

अनुज्ञेय साठा १५ क्विंटल वगळून उर्वरीत ९५.५० क्विंटल साठा विनापरवाना मोठया प्रमाणावर खाद्यतेलाची साठवणूक करुन अवैध विक्री करीत असल्याचे आढळून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याने एकूण ७,५०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२३२० (ई), दिनांक २७/०९/२०१२ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत.

महाराष्ट्र अनुसूचित वस्तु किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९७९ चे कलम २(j)(vi) अन्वये " retail dealer means- In ralations to any edible oil, a person who, whether for commission, remuneration or otherwise carries on the business of selling any hydrogenated vegetable oil only or other edible oils only or both, stores them for sale in quantities exceeding fifteen quintals in the aggregate at any one time and sells them to any other persons for consumption and not for re-sale" असे नमूद आहे.

मे. फुड बाजार या कंपनीच्यावतीने ते करीत असलेल्या खाद्यतेलाच्या किरकोळ व्यवसायाकरिता त्यांना महाराष्ट्र अनुसुचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९७९ चे कलम २ २(j)(vi) अन्वये किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने मे. फुड बाजार या कंपनीने सादर केलेले निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता त्यांनी उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांचे कार्यालयात दिनांक १८/०१/२०१० रोजी खाद्यतेलाच्या व्यवसायाकरीता नविन किरकोळ परवानासाठी अर्ज केल्याचे दिसुन येते. तदनंतरच्या कालावधीत अनुज्ञप्ती प्राधिकारी यांच्या कार्यालयाकडून दिनांक १७/०४/२०१०, २७/१२/२०१२ व दिनांक २१/०१/२०१३ रोजी संबंधित आवेदकास पत्र देवून आवश्यक कागदपत्रांची तात्काळ पुर्तता करण्याबाबत सुचित करण्यात आले व त्याअनुषंगाने दिनांक ०३/०१/२०१३ व २४/०१/२०१३ या दोन दिवशी त्यांना सुनावणीस उपस्थित रहाण्याची संधीही देण्यात आली. अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालात, मे. फुड बाजार, चेंबुर यांनी आवश्यक नविन कागदपत्रांची अद्यापपर्यंत पुर्तता केलेली नसल्यामुळे त्यांना किरकोळ परवाना वितरीत करण्यात आलेला नाही असे नमुद केले आहे. म्हणजेच दिनांक १८/०१/२०१० रोजी मे. फुड बाजार या कंपनीने नविन परवानासाठी अर्ज करुनही तपासणीचे दिवसापर्यंत आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली नाही. यावरुन त्यांनी परवाना मिळण्याकरीता अर्ज करुन फक्त सोपस्कार पुर्ण केल्याचे दिसुन येत असुन त्यांना सदरचा परवाना प्राप्त करुन घेण्याकरीता स्वारस्य नसल्याचे स्पष्ट होत आहे.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये अर्जदाराने अर्ज करतांना तपासणीसुची प्रमाणे सर्व कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक असुन तसे न केल्यास अर्जदाराने या

कागदपत्रांची ३० दिवसात पुर्तता करणे आवश्यक असल्याचे नमुद असुन त्यानंतर देखील अर्जदाराने कागदपत्रांची पूर्तता न केल्यास सदर अर्ज निकाली काढावा अर्थात कागदपत्रांची पुर्तता करणेस दिलेले ३० दिवस ही अंतीम तारीख असेल असे स्पष्ट नमुद केले आहे.

सदर प्रकरणी मे. फुड बाजार या कंपनीस पुरेशी संधी देवून देखील त्यांनी कागदपत्रांची पुर्तता विहीत मुदतीत केली नसल्याने, उपरोक्त शासन परिपत्रकानुसार अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी सदरचा नविन परवानाकरीता अपुर्ण कागदपत्रांसह प्राप्त झालेला अर्ज निकाली काढणे अपेक्षीत होते. तथापी, अनुज्ञप्ती प्राधिकारी यांचे अहवालाचे अवलोकन करता, मे. फुड बाजार यांनी कागदपत्रांची पुर्तता केली नसल्याने किरकोळ परवाना वितरीत करण्यात आलेला नाही असे नमुद केले आहे. म्हणजेच मे. फुड बाजार या कंपनीचा प्राप्त झालेला अर्ज हा आजमितीस निकाली काढण्यात आलेला नाही हे स्पष्ट होत आहे.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये शासनाने लागु केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्रशासनाने डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठयावर निर्बंध आणलेले आहेत. त्यामुळे या वस्तुंचा व्यापार करण्यासाठी घाऊक अथवा किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. सदर परिपत्रकातील अनुक्रमांक २ अन्वये ज्या व्यापाऱ्यांनी परवानासाठी अर्ज केलेले आहेत त्यामध्ये काही त्रुटी असतील तर त्याची पुर्तता करण्याच्या सुचना संबंधित व्यापाऱ्यांना द्याव्यात व त्यांनी सर्व कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर त्यांना तात्काळ परवाना देण्याची कार्यवाही क्षेत्रिय कार्यालयांनी करावी. तोपर्यंत त्यांना व्यापार करण्यास परवानगी द्यावी. असे स्पष्ट नमुद आहे.

शासनाने महाराष्ट्र डाळी, खाद्यतेल बिया आणि खाद्यतेल (साठा निर्बंध) आदेश (सुधारणा) आदेश, २०१० अन्वये पारित केलेल्या साठा मर्यादेच्या आदेशामध्ये खाद्यतेल (वनस्पती तेलासह) करीता महानगरपालिका क्षेत्रात घाऊक व्यवसायासाठी १००० क्विंटल तसेच किरकोळ व्यवसायासाठी ४० क्विंटल विहीत कमाल मर्यादा नमूद आहे.

मे. फुड बाजार या कंपनीच्या वतीने सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांनी स्टोअरच्या पत्त्यावर शिधावाटप विभागाचा परवाना मिळण्यासाठी अर्ज केला असून अधिकाऱ्यांनी त्यांच्या नमूद स्टोअरवर भेट दिली असता, खाद्यतेलाचा साठा हा विहीत मर्यादेपेक्षा अतिरिक्त आढळून आला आहे. त्यांच्या कंपनीच्या किरकोळ व्यवसायात देशभरात अनेक स्टोअर कार्यरत असून त्यांचा ग्राहकांना वाजवी किंमतीत पुरवठा करण्याचे ध्येय आहे. स्टोअरच्या वतीने बिग डेज ही स्किम नियमितपणे राबविण्यात येत असून सदर दिवशी एकाच वेळेस ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती असते. सदर दिवशीच ग्राहकांच्या मागणीनुसार साठ्याची अतिरिक्त साठवणूक केली जाते. त्याअनुषंगाने ग्राहकांची गरज लक्षात घेऊन त्यांनी सदर दिवसासाठी मोठ्या प्रमाणावर खाद्यतेलाची खरेदी

CONTROLLER OF RATIONING ... HEAD ... MUM

केली असल्याचे सांगितले. उपरोक्त विवेचनाचे अवलोकन करता मे. फुड बाजार या कंपनीच्या वतीने अतिरीक्त आढळून आलेल्या साठयाची बाब मान्य केली आहे. तथापी, सुनावणीच्या वेळी त्यांनी केवळ अतिरीक्त साठवणुकीबाबत भाष्य केले असुन नविन परवानाकरीता आवश्यक कागदपत्रे सादर करण्यास झालेल्या विलंबाबाबत काहीच भाष्य केले नाही ही आश्चर्यजनक बाब आहे. सदर गुन्हा नोंद प्रकरणी मे. फुड बाजार, चेंबुर येथे तपासणीचेवेळी पथकास एकुण ११०.५० क्विंटल खाद्यतेलाचा साठा आढळून आला आहे. सदर साठयापैकी पथकाने मे. फुड बाजार या कंपनीस किरकोळ व्यवसायाकरीता विनापरवाना अनुज्ञेय असलेला १५ क्विंटल खाद्यतेलाचा साठा वगळून उर्वरीत ९५.५० क्विंटल खाद्यतेलाचा साठा हा विनापरवाना असल्याचे गृहीत धरुन जप्त करण्यात आला आहे. तथापी, शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये व्यापाऱ्याने नविन परवानासाठी अर्ज केले असल्यास त्याला परवाना प्राप्त होईपर्यंत विहीत मर्यादेत व्यवसाय करण्यास अनुमती देण्यात आली असल्याने मे. फुड बाजार यांचा तपासणीचे वेळी घटनास्थळी साठवणुक केलेल्या एकुण ११०.५० क्विंटल साठयापैकी किरकोळ व्यवसायासाठी विहीत केलेल्या कमाल मर्यादेनुसार ४० क्विंटल साठा वजा जाता उर्वरीत ७०.५० क्विंटल साठा हा विहीत कमाल मर्यादेपेक्षा अतिरीक्त असल्याचे आढळून येते. तथापी, पथकाने तपासणीचेवेळी एकुण साठयापैकी १५ क्विंटल साठा हा जागीच मुक्त केला असल्याने संचस्थितीत जप्त असलेल्या ९५.५० क्विंटल साठयापैकी २५ क्विंटल साठा हा मुक्त करण्याच्या तसेच उर्वरीत अतिरीक्त असलेला ७०.५० क्विंटल खाद्यतेलाचा संपुर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये गोवंडी पोलिस ठाणे, मुंबई येथे वि.स्था.गु.र.क्र. ०५/२०१३, दिनांक १४/०२/२०१३ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u> :-**

१) प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या एकुण ९५.५० क्विंटल खाद्यतेलाच्या साठयापैकी २५ क्विंटल खाद्यतेलाचा साठा हा मुक्त करण्यात यावा.

२) उपरोक्त प्रमाणे २५ क्विंटल खाद्यतेलाचा साठा मुक्त केल्यानंतर उर्वरीत अतिरीक्त असलेला ७०.५० क्विंटल खाद्यतेलाचा साठा हा शासनजमा करण्यात यावा.

३) उक्त शासनजमा करण्यात आलेला खाद्यतेलाचा साठा हा पोलिसांनी उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा (दुरध्वनी क्र. ०२२-२४१२५४९५) यांचे मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,
१) मे. फुड बाजार, के स्टार्सचे मालक
२) मे. फुड बाजार, के स्टार्सचे सुपरवायझर जनार्दन काळूराम काळे
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गोवंडी पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,
१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गोवंडी पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
५) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.